दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

● वर्ष १६ वे ● अंक ८९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२३ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## निवृत्त पोलीस अधिकाऱ्याचा मुलगा ड्रग्सच्या विळख्यात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) ड्रग्ज प्रकरणात सेवानिवृत्त एसीपीच्या मुलाला अटक केली आहे. निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या मुलाचं नाव श्रेयस केंजळे आहे. गोरेगावमध्ये नागरी निवारा येथे त्याच्या राहत्या घरी एनसीबीने छापा टाकून ही कारवाई केली.

दोन वेगवेगळ्या एनसीबीने केलेल्या कारवाईत ९ किलोग्रॅम चरस, ४३६ एलसीडी ब्लॉट्स आणि ३०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. एनसीबीला मिळालेल्या माहितीवरून गोरेगाव पूर्वे कडील नागरी निवारा येथील आरोपी श्रेयस केंजळे याच्या घरी छापा टाकून एनसीबीने मोठा ड्रग्स साथ जप्त केला. घरातून ४९६ एलसीडी ब्लॉट्स आणि ३०० ग्रॅम गांजा २१ जूनच्या रात्री टाकलेल्या छाप्यादरम्यान हस्तगत करण्यात आला. तर दुसऱ्या एनसीबीच्या ऑपरेशनमध्ये दादरमध्ये २ बाईक जप्त करण्यात आल्या, या बाईकच्या पेट्रोलच्या टाकीत ९ किलो चरस आढळुन आले. ऐकून १७.३ किलो चरस जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या बाईक राजविंदर सिंग आणि गुरमित सिंग हे आरोपी ड्रग्ज तस्करीसाठी वापरत होते.

# राज्याच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ५ जुलैपासून ; दोनच दिवसांचे अधिवेशन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोरोना संकटाची सध्याची स्थिती पाहता आणि तिसऱ्या लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेऊन मुंबई येथे होणाऱ्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी दि.५ व ६ जुलै या दोन दिवसाचे कामकाज निश्चित करण्यात आले आहे.**

विधीमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक विधानभवनाच्या प्रांगणात झाली. या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, संसदीय कार्यमंत्री ड.अनिल परब, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, संसदीय कार्य राज्यमंत्री संजय बनसोडे, मंत्रीमंडळातील सदस्य, विधानपरिषद आणि विधानसभा कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, संसदीय कार्य विभागाचे सचिव राजेंद्र भागवत आदी उपस्थित होते.

बैठकीत पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाजासंदर्भातील तात्पुरत्या दिनदर्शिकेवर चर्चा करण्यात आली.




कोरोना विषाणूचा संसर्ग होवू नये म्हणून विधानभवनात अधिवेशन कालावधीमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व मान्यवरांना, अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी यांच्याकरिता लसीकरणाचे दोन्ही डोस घेतलेले असले तरी अधिवेशन कालावधीत विधानभवन परिसर प्रवेशाकरिता सर्वांना ठ्ढ-झउठ कोरोना चाचणी सक्तीची करण्यात आली आहे.

यासाठी विधानभवन, मुंबई येथे शनिवार व रविवारी दि. ३ व ४ जुलै, २०२१ रोजी RT-PCR कोरोना चाचणीसंदर्भात व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच गर्दी होवू नये यासाठी विधानमंडळाच्या सदस्यांचे स्वीय सहायक, वाहनचालक व सुरक्षा रक्षक यांची बसण्याची व्यवस्था बाहेरील तंबूमध्ये करण्यात येणार आहे. मंत्री व राज्यमंत्री यांच्यासोबत एकाच अधिकाऱ्याला प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच अधिवेशन कालावधीत खासगी व्यक्तींना विधानभवनात प्रवेश देण्यात येणार नाही. याचबरोबर मंत्रालय अधिकारी व कर्मचारी यांना देखील मर्यादित स्वरुपात प्रवेश देण्यात येणार आहे. सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टीने सभागृहामध्ये सदस्यांकरिता एका आसनावर एक सदस्य अशा प्रकारे व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच प्रेक्षक गॅलरी, विद्यार्थी गॅलरीमध्ये देखील सदस्यांची बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच सदस्यांना एक किट देण्यात येणार असून त्यामध्ये एक फेस शिल्ड, मास्क, हॅडग्लोव्हज, हँड सॅनिटायझेशनची बॉटल देण्यात येणार आहेत.

# दि.बा.साहेबांच्या नावाला वाढता पाठींबा

### वारकरी महामंडळ, व्यापारी संघ, उरण वारकरी सांप्रदाय यांनीही दिला पाठींबा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, यासाठी वारकरी महामंडळ महाराष्ट्र राज्य, पनवेल महापालिका व्यापारी संघ, तसेच उरण तालुका वारकरी सांप्रदाय सामाजिक मंडळाने लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय सर्व पक्षीय कृती समितीला जाहीर पाठिंबा दिला आहे.

पनवेल येथे झालेल्या बैठकीत वारकरी महामंडळ महाराष्ट्र राज्य, पनवेल महापालिका व्यापारी संघ, तसेच उरण तालुका वारकरी सांप्रदाय सामाजिक मंडळाने पाठिंबा पत्र दिले. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव



नाईक, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार गणपत गायकवाड, पनवेल महानगरपालिकेचे उपमहापौर जगदिश गायकवाड, कॉ. भूषण पाटील, काँग्रेसचे प्रदेश सचिव संतोष केणे, राष्ट्रवादीचे गुलाबराव वझे, जे. डी. तांडेल, दीपक म्हात्रे, भाजपचे युवा नेते दशरथ भगत, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, कामगार नेते सुरेश पाटील, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

वारकरी महामंडळ .../२

# पालकमंत्री कु. आदिती तटकरे वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने सन्मानित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रायगड जिल्ह्यात करोना या साथीच्या रोगाविरुद्ध केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड कु. आदिती सुनील तटकरे यांना वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेमार्फत पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले.

कोविड-१९ या जागतिक महामारीत मानवजातीच्या हितासाठी केलेल्या प्रामाणिक कार्याचा गौरव लंडन येथील वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड ही संस्था जागतिक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून करीत आहे. रायगड जिल्ह्यातील करोना कालावधीत केलेल्या सूक्ष्म नियोजनबद्ध कार्याचा जनतेला आरोग्य सुविधा व सहकार्य लाभले, असे मत वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डच्या महाराष्ट्र अध्यक्ष फराह सुलतान अहमद यांनी व्यक्त केले. आपल्यासारख्या तरुण व महिला पालकमंत्री रायगड जिल्ह्यासाठी कार्यरत



आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो. आपल्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात असे जनहितार्थ कार्य घडत रहावे, अशा शुभेच्छा पुरस्कार प्रदान करतांना त्यांनी दिल्या.

यावेळी आमदार रोहित पवार, आमदार संग्राम जगताप, आमदार कैलास गोरंट्याल व अध्यक्ष फराह सुलतान अहमद या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने उपस्थित होत्या.

## संक्षिप्त...

### टिआरपी घोटाळा प्रकरणी मुंबई पोलिसांचं पुरवणी आरोपपत्र सादर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

टिआरपी घोटाळा प्रकरणी अखेर अर्णब गोस्वामी यांना आरोपी घोषित करण्यात आलं आहे. मुंबई पोलिसांनी याप्रकरणी आपलं पुर-वणी आरोपपत्र मंगळवारी कोर्टापुढे सादर केलं. या आरोपपत्रात अर्णब गोस्वामींसह सात नव्या आरोपींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणातील एकूण आरोपींची संख्या आता २२ वर पोहचली आहे. एकूण १९१२ पानांचं हे आरोपपत्र असून अर्णब गोस्वामींसह प्रिया मुखर्जी, शिवा सुब्रमण्यम, अमित दवे, संजय वर्मा, शिवेंद्र मुलधेरकर, रणजित वॉल्टर यांचा आरोपी म्हणून समावेश करण्यात आला आहे.

या सर्वांवर आयपीसी कलम ४०६ (गुन्हेगारी कारवाई), ४०९ (व्यावसायिकाकडनं फसवणूक), ४२० (आर्थिक फसवणूक), ४६५ (अफरातफर), ४६८(आर्थिक फसवणूकीच्या हेतूनं फेरफार), १२०(बी) (कट रचणे), २०१ (पुरावे नष्ट करणे), ३४ (संगनमतानं केलेला गुन्हा) या विविध कलमांखाली आरोप लावण्यात आले आहेत.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

# माथेरानमधील शिवसेनेच्या बंडखोर नगरसेवकांच्या अपात्रतेबाबतीत ३० जूनला सुनावणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या २०१६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाली होती. त्यावेळी एकूण सतरा जागांपैकी चौदा जागांवर शिवसेनेचे उमेदवार निवडून आले होते. तेव्हापासून ते आजपर्यंत जवळपास साडेचार वर्षे सर्वजण एकत्रित कामे करण्यासाठी पुढाकार घेत होते गुण्यागोविंदाने सर्वकाही सुरळीत चालू असताना आपसात अंतर्गत मतभेदांमुळे यातील उपनगराध्यक्ष आणि एक स्वीकृत सदस्य अशा एकूण दहा नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षामध्ये मे महिन्यात प्रवेश केला होता. या सर्वांना पुन्हा पक्षात येण्यासाठी संधी देण्यात आली होती परंतु ह्या पक्षांतर केलेल्या नगरसेवकांनी त्यास कुठल्याही प्रकारचा दुजोरा दिला नाही. याबाबत दि.२७ मे रोजी सायंकाळी शिवसेना पक्षाची बैठक होऊन सदर नगरसेवकांनी केलेल्या पक्षांतर बाबत शिवसेना व उपस्थित गटनेते ह्यांनी विचारविनिमय करून आपण पक्षांतराची कृती क्षमारपित करण्यात आली नाही असे जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरविकास विभाग श्रेणी-१ रायगड अलिबाग यांना कळविले. त्यानुसार महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ चे कलम३(१) कलम ५ यातील तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या असणाऱ्या सभासदांना किंवा सदस्यांनी (अ ) जर अशा राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडुन दिले तर तो सभासद किंवा सदस्य राहण्यास अनर्हत (अपात्र) होईल.

महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम १९८७ मधील कलम ७ (५) अन्वये कोणत्याही प्रश्नावर निर्णय देण्यासाठी आणि पोटनियम (४ ) अन्वये प्राथमिक जी कार्यपद्धती अनुसरण्यात येईल ती पोटनियम (६ ) ते (१५) नुसार कारवाई करण्यापूर्वी या पक्षांतर केलेल्या सदस्यांनी आपली बाजू मांडणेकामी जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग येथे ३० जून २०२१ रोजी सकाळी अकरा वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली आहे आणि सदर सुनावणीला पक्षांतर केलेले सदस्य उपस्थित न राहिल्यास पुढील कारवाई केली जाणार आहे. त्याबाबतच्या पत्राची प्रत जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरविकास विभाग श्रेणी-१ रायगड अलिबाग यांनी मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषद यांना देण्यात आली आहे. माथेरानच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदा अशाप्रकारे ही घटना घडली आहे त्यामुळे ३० जूनला काय निर्णय होईल याकडे संपूर्ण माथेरान करांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# कळंबोलीत इमारतीचा काही भाग कोसळून महिला जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीत इमारतीच्या छताचा काही भाग कोसळून एका महिला जखमी झाली आहे. डोक्याला मार लागला असून तीला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती नगरसेवक गोपाळ भगत व नगरसेविका प्रिया भोईर यांनी दिली.

कळंबोलीसह, खारघर, नविन पनवेल, खांदा कॉलनी आदी ठिकाणी सिडकोचे निकृष्ट दर्जाची बांधकामे झाली आहेत. असा जुन्या-जर्जर, धोकादायक इमारतींचे स्लाप कोसळण्याच्या घटना वारंवार होत आहेत. यात अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या गंभीर समस्येवर सिडको प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे, सिडकोवर मोर्चे काढले, स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणे साठी रास्ता रोको आंदोलन केले, या जुन्या जर्जर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येवून त्या धोकादायक राहण्यास लायक नसल्याचे सिडकोने इमारती व दरवाजांवर फलक लावले आहेत. मग सिडको या जुन्या जर्जर इमारतीचा पुनर्विकासाचा तोडगा काढणार कधी? रहिवासीचे जीव घेण्याची वाट पहात आहे का? असा संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

कळंबोली सेक्टर ५ बी, १०/१-४ अष्टविनायक सोसायटी येथे राहात असलेल्या वनिता नारायण यादव या कामावरून आल्यानंतर आराम करत असताना इमारतीच्या छताचा भाग त्याच्या डोक्यावर पडून त्या जखमी झाल्या आहेत.

त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असून त्यांच्या डोक्याला सहा टाके पडले आहेत. या घटनेची माहिती मिळताच नगरसेवक गोपाळ भगत व नगरसेविका प्रिया भोईर यांनी घटना स्थळी जावून प्रथम जखमी महिलेला हॉस्पिटलमध्ये दाखल करून नंतर सिडको प्रशासनाला यांची माहिती दिली.

# सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या प्रांगणातील कचरा तातडीने हलवून स्वछता राखा : प्रितम म्हात्रे





**दै.रायगड नगरी । पनवेल**

सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या प्रांगणातील कचरा तातडीने हलवून स्वछता राखण्याची मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पनवेलचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शाळा हे ज्ञानाचे मंदिर आहे. येथे ज्ञानदानाचे अनमोल कार्य केले जाते. सध्या ह्या शाळेत अतिक्रमण करून कारवाई केलेला कचरा येथे साचविला जा-तो. शाळेच्या मैदानात कचरा बघून शहरातील माजी विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. ह्या शाळेत शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी येथे घडले आहेत. त्यामुळे तातडीने स्वच्छ करून मैदान मोकळे करण्यात यावे. अन्यथा माजी विद्यार्थी आंदोलनाच्या तयारीत आहेत ह्याची नोंद प्रशासनाने घ्यावी.

शाळेची इमारत .../२

> सध्या ह्या शाळेत अतिक्रमण करून कारवाई केलेला कचरा येथे साचविला जातो. शाळेच्या मैदानात कचरा बघून शहरातील माजी विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. ह्या शाळेत शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी येथे घडले आहेत. त्यामुळे तातडीने स्वच्छ करून मैदान मोकळे करण्यात यावे.
>
> **: प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्षनेता, पनवेल महानगरपालिका**

# विलंब शुल्क भरलेल्या अर्जदारांना विलंब शुल्क परत करण्याचा सिडकोचा निर्णय

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महागृहनिर्माण योजना २०१८-१९ मधील सदनिकेकरिता भरावयाच्या ५ व ६ व्या हप्त्यांवरील विलंब शुल्कास यापूर्वीच माफी देण्यात आल्याने ज्या ३,४१७ अर्जदारांनी सदर हप्त्यांवर विलंब शुल्क भरले आहे, त्यांचे विलंब शुल्क परत देण्याचा निर्णय सिडको महामंडळाकडून घेण्यात आला आहे. सिडकोतर्फे अर्जदारांमार्फत भरण्यात आलेली अंदाजे रू. १ कोटी ७ लाख रक्कम परत करण्यात येणार आहे. सदरची रक्कम अर्जदारांनी ज्या बँक अकाऊंटमधून




> कोविड-१९ मुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर, सिडकोने सहानुभूतीपूर्वक विचार करून महागृहनिर्माण योजना २०१८-१९ मधील अर्जदारांचे विलंब शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे ज्या अर्जदारांनी हा निर्णय येण्यापूर्वीच विलंब शुल्क भरले होते, त्यांचे विलंब शुल्क परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

भरली असेल त्याच अकाऊंटमध्ये परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे रक्कम भरताना अर्जदारांनी ज्या माध्यमाचा वापर केला असेल, त्याच माध्यमातून रक्कम परत करण्यात येईल.

यांपैकी ३,४१७ अर्जदारांनी ५ आणि ६ व्या हप्त्यांवर लागू होणारे विलंब शुल्क .../२

# दोन ध्रुवांवरचे चौघे

महाराष्ट्राच्या इतिहासात काँग्रेसला जेव्हा जेव्हा पूर्ण बहुमत मिळाले नाही किंवा काँग्रेस पक्ष फोडण्यात आला; तेव्हा तेव्हा राजकीय अस्थिरता निर्माण झाली. १९७८ पासूनचा इतिहास पाहिला तर हे लगेच लक्षात येईल. काँग्रेसची जागा भारतीय जनता पक्षाने केंद्रात घेतली आणि लागोपाठ दोन निवडणुकांमध्ये तेथे वाढते बहुमत मिळवले. मात्र, महाराष्ट्रात काँग्रेसची पीछेहाट ज्या वेगाने झाली, त्या वेगाने भाजपची वाढ झालेली नाही. काँग्रेसचा जुना राजकीय अवकाश आज राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या तीनही प्रमुख पक्षांनी कमी–अधिक प्रमाणात खेचून घेतला आहे. या विचित्र चित्रामुळे महाराष्ट्रात काँग्रेस आणि भाजप हे दोन अचल ध्रुव आणि शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन फिरते रंगमंच, अशी आज अवस्था झाली आहे. प्रताप सरनाईक यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र, नाना पटोले यांची स्वबळाची भाषा आणि त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेसची शिवसेनेसोबत लढण्याची तयारी ही सगळी राजकीय अस्थिरता एका ध्रुवावर तिघांची गर्दी झाल्यामुळे आली आहे. हे सरकार जन्माला आले; तेव्हाच त्याच्या नैसर्गिक स्थैर्याची अनेकांना शंका होती. अलीकडच्या घडामोडी या शंकांमध्ये तथ्य होते, हे दाखविणाऱ्या आहेत. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना एकतर्फी बिनशर्त पाठिंबा देऊन टाकला होता आणि शिवसेनेची राजकीय कोंडी केली. त्यानंतर पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपला पहाटेचे खरे न झालेले औट घटकेचे स्वप्न पडले. आज ज्या घडामोडी घडत आहेत, त्यांची बीजे ही या दोन प्रादेशिक पक्षांनी परस्परांशी दोस्ती दाखवत दाखवत एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी चाललेल्या कारवायांमध्ये आहेत. प्रताप सरनाईक हे शिवसेनेत असले तरी 'स्वबळावर' निवडून येऊ शकणारे आमदार आहेत. त्यांच्या मागे केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिराही लागला आहे. मात्र, त्यांनी पत्रात हा ससेमिरा टाळण्यासाठी (तरी) भाजपसमवेत जाऊया, असा जो सूर लावला आहे, तो महाराष्ट्राचे राजकारण इतके 'ब्लॅकमेलिंग' करण्याच्या पातळीवर जाऊन पोहोचले आहे काय, अशी शंका सामान्य नागरिकांना पडू शकते. असे असेल तर केंद्रीय कारवाईपासून वाचण्याची ज्यांची इच्छा आहे; अशी मोठी यादीच अनेकांकडे तयार असणार. तसे असेल तर प्रताप सरनाईक हे केवळ नाव बदलून अशी अनेक पत्रे उद्या लिहून घेतली जाऊ शकतात. नेमकी प्रसिद्धीला दिलीही जाऊ शकतात. प्रताप सरनाईक यांचे हे पत्र खरेतर केंद्र सरकार आकसाने किंवा सूडबुद्धीने राजकीय विरोधकांवर कारवाई करीत आहे, असे सूचित करणारे आहे. असे असूनही भाजपमधील काही नेत्यांमध्ये या पत्रानंतर अचानक जो उत्साह संचारला, तो तर धक्कादायकच होता. या पत्रातले 'काँग्रेस आणि राष्ट्रवादी शिवसेनेला खिळखिळी करीत आहेत,' हे वाक्य महत्त्वाचे आहे. यातल्या काँग्रेसची अवस्था 'घरचे झाले थोडे..' अशी आहे. ते कसे काय शिवसेनेला खिळखिळे करणार? काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जे काही बोलत असतात, त्यातून काँग्रेसची स्थिती लक्षात येते. त्यांची स्वबळाची भाषा उत्साहवर्धक असली तरी ती अनाठायी आणि अप्रासंगिक होती. त्यामुळे, शिवसेनेचे पक्षप्रमुख म्हणून भाषण करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजप किंवा राष्ट्रवादी सोडून काँग्रेसलाच लक्ष्य केले. ते अधिक सोपेही होते. राजधानीत शरद पवार काँग्रेसेतर विरोधकांच्या ऐक्याचे प्रयत्न करीत असताना त्यांच्या पुढाकाराने स्थापन झालेले महाराष्ट्रातले तिघांचे सरकार मात्र राजकीयदृष्ट्या अस्थैर्याकडे वाटचाल करीत आहे. उद्धव ठाकरे यांची आधी पंतप्रधानांशी एकान्तभेट, त्यानंतर राज्यपालांना वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि नंतर शिवसेनेच्या वर्धापन दिनी आपल्या टीकेच्या भडिमारातून भाजपला दूर ठेवणे.. या सगळ्यांतून नेमका काय राजकीय संदेश जातो आहे? तोही खरा आहे की, हूल आहे, हा प्रश्नही पुढचे काही दिवस अनुत्तरित राहणारा आहे. राष्ट्रीय पातळीवर विरोधकांचे जे संभाव्य ऐक्य होणार आहे; त्यात शिवसेनेला काय स्थान असणार आहे किंवा शिवसेनेला नेमके काय अभिप्रेत आहे, हाही प्रश्न आहेच. राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणतात, तसे शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष मुंबई आणि महाराष्ट्रात एकत्र लढणार आहेत का? आणि तसे असेल तर सध्याच्या महाविकास आघाडीतील काँग्रेसवर सत्तेचे स्वबळ लादणार का, हाही प्रश्न आहेच. थोडक्यात, करोनाची दुसरी लाट आटोक्यात येते आहे, हे दिसू लागल्यावर सगळ्यांनी फासे टाकायला सुरुवात केली आहे. सत्तेचा तोल आणि कल आपणच ठरवू, असे पूर्वी महाराष्ट्रात एकाच पक्षाला वाटत होते; आता ते दोघांनाही वाटू लागल्याने अस्थिरतेचे नवे पर्व सुरू झाले आहे. पुढच्या काही आठवड्यांमध्ये या खेळाचे नवनवे रंग महाराष्ट्राला दिसत राहणार आहेत.

# एमएमआरडीएच्या लोह व स्टील कमिटीवर नगरसेवक बबन मुकादम यांची सर्वानुमते निवड




**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या लोह व स्टील मार्केट समितीवर पनवेल महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून नगरसेवक बबन मुकादम यांची सदस्य पदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. अत्यंत महत्त्वाच्या पदी नियुक्ती झाल्याबद्दल नगरसेवक बाबांना मुकादम यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्टील मार्केट कमिटीचे कार्यक्षेत्र आहे. एम एम आर स्पेसीफाईड कमोडिटी मार्केट एक्ट १९८३ कलम ९(१) नुसार सदर मार्केट ज्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत असेल त्या महानगरपालिकेच्या नगरसेवकांकडून एका नगरसेवकाची नेमणूक सदर मार्केट कमिटीवर सदस्य म्हणून करण्यात येते. तूर्तास स्टील मार्केट कमिटी वर २२ सदस्य असून त्यांतील सहा सदस्यांची नेमणूक निवडणूक प्रक्रिया नुसार करण्यात येते तर अन्य १६ सदस्य विविध आस्थापनांच्यातून नियुक्त केले जातात.

पनवेल महानगरपालिकेच्या जून महिन्यातील सर्व साधारण सभेमध्ये नगरसेवक हरीश केणी यांनी स्टील मार्केट कमिटी वर सदस्य पदी नियुक्त करण्यासाठी नगरसेवक बबन मुकादम यांचे नाव सुचविले. सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यास अनुमोदन दिल्यानंतर बबन मुकादम यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. बबन मुकादम कळंबोली कॉलनी मध्ये वास्तव्यास असल्या कारणामुळे स्टील मार्केटशी निगडित समस्या सोडविण्यासाठी ते कायम अग्रस्थानी राहिले आहेत. स्टील कमिटीचे अध्यक्ष, व्यापारी प्रतिनिधी, वाहतूकदार यांची लवकरच एक संयुक्त बैठक घेणार असल्याचे बबन मुकादम यांनी सांगितले. तसेच त्यांच्या नियुक्तीला दुजोरा दिल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृहनेते परेश ठाकूर यांचे आभार मानले. नियुक्ती नंतर नगरसेवक बबन मुकादम यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांनी बबन मुकादम यांना यशस्वी कारकिर्दी करता शुभेच्छा दिल्या.

# जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोशिश फाऊंडेशनच्या वतीने जागतिक योग दिन पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात उत्साहात साजरा झाला. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धेचे बक्षीस वितरण या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते तथा कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात योग प्रशिक्षक अर्चना शाह यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित मान्यवरांनी योगसाधना केली, तर सूर्यनमस्कार स्पर्धेसही योगप्रेमींकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेतील विजेत्यांना या वेळी रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास महापालिका स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक नितीन पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, मनोज भुजबळ, अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सचिव चिन्मय समेळ, भाजप तालुका सरचिटणीस दशरथ म्हात्रे, अयुब अकुला आदी उपस्थित होते. महिला : १२ ते २१ वर्षे – प्रथम जयश्री लांडे, द्वितीय प्रियांका जोमराज, तृतीय अनघाश्री एस., चतुर्थ मृण्मयी ठाकूर व प्रणाली माने; २२ ते ३५ वर्षे – प्रथम पूर्वा मनुरकर व प्रिया सिंग, द्वितीय शुभांगी जवेरी, तृतीय ऋतुजा तुषार, चतुर्थ पूजा लोंढे व रुही तालस्कर; ३५ ते ६० वर्षे – प्रथम अंजली देवानी, द्वितीय गीता पवार, तृतीय अश्विनी बोरुडे, चतुर्थ छाया जोगडिया. पुरुष : १२ ते २१ वर्षे – प्रथम वरुण सकपाळ, द्वितीय देवराज पाटील, तृतीय सर्वेश गुप्ता, चतुर्थ देवेश जोमराज व मनोमय भोसले; २२ ते ३५ वर्षे – प्रथम विक्रम आपटे, द्वितीय आदित्य उपाध्ये, तृतीय मयुरेश कामाने, चतुर्थ किरण मोरे व अक्षय सापने; ३५ ते ६० वर्षे – प्रथम विकास देशमुख, द्वितीय निलेश कालेकर, तृतीय पुनीत शारदा, चतुर्थ मकरंद आठवले व आदित्य मिश्रा.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दि.बा.साहेबांच्या नावाला वाढता पाठींबा

महाराष्ट्र राज्यच्यावतीने ह. भ. प. अजय महाराज पाटील, पनवेल महानगरपालिका व्यापारी संघच्यावतीने पनवेल व्यापारी संघाचे अध्यक्ष नारायण ठाकूर, कळंबोली व्यापारी संघाचे अध्यक्ष कमल कोठारी, संजय जैन व इतर व्यापारी संघाचे पदाधिकारी आणि उरण तालुका वारकरी संप्रदाय सामाजिक मंडळाच्यावतीने अध्यक्ष गोपीनाथ ठाकूर व पदाधिकारी यांनी पाठिंबा पत्र कृती समितीला सुपूर्द केले.

वारकरी महामंडळाने दिलेल्या पाठिंबा पत्रात म्हंटले आहे कि, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील लोक जीवनाचा मुख्य आधारस्तंभ आहे. अनादीकाळापासून समुद्रातील दिप स्तंभाप्रमाणे दिशा दर्शविण्याचे काम करत आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांनी कामगार, शेतकरी, कष्टकरी, भूमिपुत्र, ओ. बी. सी. समाजाला तसेच बहुजनांना दिशा दर्शविण्याचे काम आयुष्यभर करून अविरत सेवा केली आहे. तसेच ऐतिहासिक जनआंदोलन उभारून साडेबारा टक्केचा न्याय मिळवून दिला. नगराध्यक्ष, पाचवेळा, आमदार. दोन वेळा खासदार, विरोधी पक्षनेते अशी पदे भुषवून समाजासाठी सभागृहात आवाज बुलंद करून न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. दिबासाहेबांचे कार्य महान आहे, आणि विमानतळ भूमिपुत्रांच्या जागेत होत आहे त्यामुळे भूमिपुत्रांचे दैवत लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळालेच पाहिजे, अशी भूमिका या जाहीर पाठिंब्यातून वारकरी महामंडळ, व्यापारी संघ, उरण वारकरी सांप्रदाय यांनी व्यक्त केली आहे.

## कचरा तातडीने हलवून स्वछता राखा : प्रितम म्हात्रे

धोकादायक घोषित झाल्याने विद्यार्थ्यांची अन्न शाळेत व्यवस्था करण्यात केली आहे. शाळेच्या जागेवर बांधा, वापरा आणि हस्तांरीत करा या तत्वावर बहुमजल वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव नगरपरिषद असल्यापासून विचाराधीन आहे. मागील काही वर्षात या प्रस्तावावर गांभीर्याने विचार करण्यात आला नव्हता. पनवेलमधील सर्वसामान्य असंख्य विद्यार्थी, याशिवाय कामगारांची शाळाबाह्य इतकेच नव्हे तर मूळचे नेपाळचे असणारे अनेक विद्यार्थी सरस्वती मंदिर शाळेतून मराठी माध्यमातून शिक्षण घेतले आहे. शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी सामाजिक, राजकीय, यासारख्या विविध यशस्वी झाले आहेत.

सध्या शाळेला डंम्पिंग ग्राउंड स्वरूप आले आहे. येथे महापालिकेची व इतर अवजड वाहने उभी असतात. शाळेची झालेली दुरवस्था पाहून माजी विद्यार्थी यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पनवेलचा ५० वर्ष जुना शैक्षणिक वारसा जतन करण्यासाठी शाळा नव्याने बांधण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सरस्वती विद्या मंदिर शाळेच्या प्रांगणातील कचरा तातडीने हलवून स्वछता राखण्याची मागणी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पनवेलचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## विलंब शुल्क परत करण्याचा सिडकोचा निर्णय

भरले आहे. यातील २,६८९ अर्जदार हे अल्प उत्पन्न गटातील व ७२८ अर्जदार हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील आहेत. या अर्जदारांकडून अंदाजे रु. १ कोटी ७ लाख इतके विलंब शुल्क भरण्यात आले आहे. परंतु कोविड–१९ महासाथीमुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर, सहानुभूतीपूर्वक विचार करून महामंडळाने २९ मे २०२० रोजी ठराव करून ५ व्या आणि ६ व्या हप्त्यांवरील विलंब शुल्कास माफी देण्याचा निर्णय घेतला होता. याकरिता ज्या ३,४१७ अर्जदारांनी ५ व्या आणि ६ व्या हप्त्यांवर विलंब शुल्क भरलेले आहे त्यांचे विलंब शुल्क परत करण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वांसाठी घरे धोरणांतर्गत सिडकोतर्फे महागृहनिर्माण योजना २०१८–१९ अंतर्गत नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोडमध्ये सुमारे २५,००० घरे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांकरिता साकारण्यात आली होती. संगणकीय सोडतीनंतर कागदपत्रांची छाननी पार पाडून ७,७४८ पात्र अर्जदार पात्र ठरविण्यात आले.

# कोरोनामुक्त गावात दहावी- बारावीचे वर्ग सुरु करण्याबाबतची शक्यता पडताळून पहावी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जी गावे मागील काही महिन्यांपासून कोरोनामुक्त आहेत आणि भविष्यातही गाव कोरोनामुक्त राखण्याची खात्री देतील अशा गावातील इयत्ता १० व १२ वी चे वर्ग सुरु करता येतील का याची शक्यता विभागाने तपासून पहावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

जी गावे मागील काही महिन्यांपासून कोरोनामुक्त आहेत आणि भविष्यात ही गाव कोरोनामुक्त ठेवण्यासाठीच्या उपाययोजनांचे कडक पालन करत गाव कोरोनामुक्त राखण्याची खात्री देतील अशा गावांमधील १० वी तसेच १२ वीचे वर्ग सुरु करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. कोरोनामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आपले दोन्ही पालक गमावले आहेत अशा विद्यार्थ्यांच्या पहिली ते बारावीपर्यंतचा शैक्षणिक खर्च शासनामार्फत उचलण्याबाबतची योजना शालेय शिक्षण विभागामार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे अशी माहिती प्रा. वर्षा गायकवाड यांनी यावेळी दिली.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसने तमाम लोकांना कळविण्यात येत आहे की, मौजे : विंधणे, ता.उरण, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिल १) प्रदीप रामचंद्र पवार, २) संजय भगवान पाटील, ३) दिनेश दत्ताराम रसाळ कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा जमीन मालकांचे नाव :– १) छाया अंबाजी घरत, २) कसुबाई अंबाजी घरत, ३) दौलत माया घरत, ४) किशोर परशुराम घरत, ५) गीता परशुराम घरत, ६) रामुबई परशुराम घरत, ७) शामकांत अंबाजी घरत, ८) मधुकर अंबाजी घरत, ९) शकुंतला रामदास जोशी, १०) जनाबाई हरिभाऊ नवाळे, ११) मुक्ताबाई बळीराम घरत, १२) अलका नवनीत म्हात्रे, १३) शारदा प्रल्हाद म्हात्रे, १४) सोमुबाई गोपाळ घरत, १५) प्रल्हाद गोपाळ घरत, १६) दशरथ गोपाळ घरत, १७) सुभाष गोपाळ घरत, १८) संदीप गोपाळ घरत, १९) अनुसया गोपाळ घरत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| भूमापन क्र. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २५९/१ | १४९.४० | ०.७८ |

**वरील मिळकतीमधील १४९.४० गुंठापैकी ०६ गुंठाचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यात येत आहे.**

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची, हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटीहक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या–येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा वर नमूद मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

बेलापूर

**सही/–**
**ॲड.निखत लालबाबू शेख (बी.कॉम एल.एल.बी.), फोन नं.९७६७३४७४३८**

**कार्यालयीन पत्ता : बी/४१७, श्री नंद धाम, प्लॉट नं.५९, सेक्टर ११, बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसने तमाम लोकांना कळविण्यात येत आहे की, मौजे : विंधणे, ता.उरण, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिल सौ.अंजली संजय खरे कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती जमीन मालकांचे नाव : १) श्री.पंढरीनाथ परशुराम म्हात्रे, २) रामनाथ परशुराम म्हात्रे, ३) मथुराबाई कुशा फोरफेरकर, ४) बळीराम परशुराम म्हात्रे, ५) सिंधूबाई बाळकृष्ण ठाकूर, ६) जानकीबाई पांडुरंग घरत, ७) जनाबाई दत्तात्रेय चिर्ले कर, ८) अरुण जनार्दन नाईक, ९) वल्लरी श्रीधर नाईक, १०) वैष्णवी मनोहर जोशी, ११) अक्षय अर्जुन ठाकूर, १२) अश्विनी राम कोंडीलकर, १३) भारती श्रीधर नाईक, १४) विकास जनार्दन नाईक, १५) प्रमोद जनार्दन नाईक, १६) आरती अशोक पाटील, १७) साधना सखाराम पाटील

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| भूमापन क्र. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २९२/२ | ०–१२–०० | ०.७८ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची, हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटीहक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या–येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ही मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा वर नमूद मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

बेलापूर

**सही/–**
**ॲड.निखत लालबाबू शेख (बी.कॉम एल.एल.बी.), फोन नं.९७६७३४७४३८**

**कार्यालयीन पत्ता : बी/४१७, श्री नंद धाम, प्लॉट नं.५९, सेक्टर ११, बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**


# कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वढाव गाव लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यासह रायगड जिल्हात कोरोनाच्या संख्या दिवसेंदिवस वाढत आहे पेण तालुक्यातील खारेपाट भाग कोरोनाचा हॉटस्पॉट बनत चालला असुन दिवसेंदिवस खारेपाट भागात कोरोना संसर्ग वेगाने वाढत असल्याने या भागातील बेणवले गावा पाठोपाठ प्रशासनाने पेण तालुक्यातील वढाव गाव कोरोना प्रतिबधित क्षेत्र घोषित केले आहे.

वढाव गावात १९ कोरोना बाधित रुग्ण सापडल्याने पुर्ण गाव लॉकडाऊन करण्यात आले असुन जर का ७ दिवसांनी कोरोना रुग्ण वाढ थांबली नाही तर पुन्हा ७ दिवस कडक निर्बंधासह लॉकडाऊन वाढवण्यात येईल असे प्रशासनाकडुन जाहीर करण्यात आले आहे. वढाव गाव लॉकडाऊन करण्यात आले असुन गावातून नागरीकांना बाहेर जाण्यास व बाहेरील व्यक्ती गावात येण्यास मनाई करण्यात आली आहे. अत्यावश्यक असेल तर घराच्या बाहेर पडा विनाकारण फिरणाऱ्या वर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. असे जाहीर करण्यात आले आहे. वढाव गावात वाढत असलेल्या कोरोना रुग्ण संख्येमुळे प्रशासनाने खबरदारीची पावले उचलली आहेत. गावातील आजारी व्यक्तीची कोरोना चाचणी आरोग्य विभागा कडुन केली जात आहे. तसेच गावात जंतूनाशक फवारणी केली जाणार आहे. कोरोना रोखण्यासाठी उपाय योजना म्हणून गावातील घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे व गावात जंतूनाशक फवारणी करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने सदर ठिकाणी कॅम्प घेऊन ॲन्टीजन टेस्ट करण्यात येत आहेत. पोलीस दलातील कर्मचारी पोलीस आधीकारी गावात जनजागृती करून नागरिकांना योग्य मार्गदर्शन करीत आहेत.


दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com



## पनवेल महानगरपालिका
### जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी–१ नमुन्यात मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ मध्ये रोज बाजार मधील पत्र्याच्या शेडवर ताडपत्री बसविणे | ३,५५,०८९/– | ३६००/– | ५००+९०=५९० | १ महिना |

याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक २४/०६/२०२१ पासून दि.०८/०६/२०२१ पर्यंत सायं.५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र.१ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सिलबंद निविदा दि.०९/०७/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्वीकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.१२/०७/२०२१ रोजी दुपारी ३.३० (शक्यतो) वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा ना मंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र.पमपा/बांधकाम/४४२१/प्र.क्र.३०/१२६१/२०२१
दि.२२/०६/२०२१

**सही/–**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पत्रकार सेवा संघ व अंकुर फाउंडेशन तर्फे वृक्षरोपण, अन्नधान्य वाटप

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुका पत्रकार सेवा संघ यांच्या संकल्पनेतुन गतवर्षातील निसर्ग व तौक्ते चक्रीवादळांच्या पार्श्वभुमीवर आपल्या रायगड जिल्हा व तालुक्यातील गोरगरीब जनता तसेच वनसंपदेचे झालेले प्रचंड नुकसान पाहता तसेच कोरोना महामारीत ऑक्सिजनची अनन्यसाधारण महत्व पाहता आपल्या प्रत्येकाने एकतरी रोपटे लावले पाहीजे, याच कर्तव्य भावनेतुन अंकुर फाउंडेशन लोणेरे आणि सामाजिक वनीकरण परिक्षेत्र माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटपाचा उपक्रम २३ जून, बुधवारी रोजी सकाळी ११ वाजता पन्हळघर बुद्रुक, आदिवासी वाडी येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

अंकुर फाउंडेशन ही संस्था गेली तेरा वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण, कला,क्रिडा व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपून योगदान देत आहे. याच संस्थेच्या खांद्याला खांदा लावत नवनिर्मित माणगांव तालुका पत्रकार सेवा संघ हा सामाजिक वनीकरण परिक्षेत्र माणगांव यांच्या समवेत पर्यावरणपर वृक्षारोपण व सामाजिक सहानुभूतीपूर्वक आदिवासी बांधवांना अन्नधान्याच्या वाटपाचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहे. सदर कार्यक्रमासाठी गोरेगांव पोलिस ठाण्याचे सहा. पोलिस निरीक्षक श्रीकृष्ण नावले तसेच स्वदेश फाउंडेशनचे संचालक तुषार इनामदार मा. ता. पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अरुण पवार तसेच अध्यक्ष व सर्व सदस्य यांची उपस्थिती लाभणार आहे.

## मनसेकडून वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना उरण यांच्या माध्यमातून संदेश भाई ठाकूर, उरण विधानसभा अध्यक्ष विजय तांडेल यांच्या मार्गदर्शना खाली मनसेचे नेते तथा माजी मंत्री बाळा नांदगावकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्त कोमनादेवी ऑक्सिजन पार्क सारडे येथे वृक्षरोपणाचा कार्यक्रमाचे आयोजन मनसेचे उप तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी केले होते.

यावेळी मनसे विभाग अध्यक्ष दिपक पाटील, सारडे विकास मंचाचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, बबन ठाकूर, अभय पाटील, संजोग माळी सह बचे मंडळी उपस्थित होती.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# माथेरान नगरपरिषदेत पुन्हा एकदा सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेचे दिग्गज शिलेदार सज्ज

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान नगरपरिषदेच्या सभागृहात शिव–सेनेचे एकहाती वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी २०१६ मध्ये शिवसैनिकांनी जीवाचे रान केले होते. शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली आणि एकंदरीत शिवसेनेच्या कार्यपद्धती वर खुश होऊन मतदार राजाने शिवसेनेच्या बाजूने कौल दिला होता. एकूण सतरा पैकी चौदा जागांवर घवघवीत विजय संपादन केला होता. परंतु जिथे गावाचा विकास करतांना पक्ष श्रेष्ठीं मध्ये एकोपा उदयास आला की तिथे विरोध करणारी ही बाहेरची मंडळी नसुन पक्षातील घरभेदी मंडळींमुळे पक्ष श्रेष्ठीं मध्ये दुजाभाव करण्याचीही कुटील खेळी करण्यास सुरुवात झाली होती. शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि संपर्क प्रमुख प्रसाद सावंत यांच्यात तेढ निर्माण करण्यासाठी जणूकाही पक्षातील काही मंडळींनी विडा उचलला होता त्याप्रमाणे गावात चर्चेला उधाण आले होते. स्थानिक मंडळी हे सारे पाहून अचंबित झाली होती की गावात कधी नव्हे एवढी विकासाची कामे प्रगतीपथावर सुरू आहेत बहुतांश कामे मार्गी लागलेली असताना पक्षात कुरघोडी का केली जात आहे. ही मोठ्या प्रमाणावर होत असलेली गावची विकास कामे पाहून अन्य काही पक्षातील कार्यकर्त्यांनी सुद्धा समाधान व्यक्त केले होते. एवढेच नव्हे तर चौधरी आणि सावंत या दोन दिग्गजां मध्ये 'अ' आणि 'ब' असे दोन गट सुध्दा निर्माण करण्यात आले होते. असे असतानाही प्रसाद सावंत यांनी नेहमीप्रमाणे आपल्या कामकाजावर लक्ष केंद्रित केले होते. शिवसेना हे एक कुटुंब असून कुटुंबात वाद विवाद होत असतात हे काही नवीन नाही त्यामुळे पक्षा–तील अप्रत्यक्षपणे होत असलेल्या टीकाटिप्पणी कडे कानाडोळा करत त्यांनी गावाच्या विकास कामांवर अधिक लक्ष देऊन वरिष्ठांना इथली भौगोलिक परिस्थिती कथन करून मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करून घेतला त्यामुळेच आज ही विकासाची कामे दृष्टीक्षेपात दिसत आहेत. चंद्रकांत चौधरी आणि प्रसाद सावंत यांनी एकत्रित येऊन कामे करावीत अशी सर्व स्तरा–तून चर्चा होती. आजी माजी पदाधिकारी तसेच शिवसैनिकांची गावातील जेष्ठ नागरिकांची सुध्दा याबाबतीत प्रामाणिक इच्छा होती. त्यानुसार हे दोन दिग्गज नेते पुन्हा एकदा एकत्र आले असून यामुळेच सर्व शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी आता गावातील तळागाळातील शिवसैनिक सुध्दा जोमाने काम करण्यास उत्सुक झाले आहेत. सर्वच कार्यकर्त्यांनी सत्ता स्थापन करण्याचा चंग बांधल्या मुळे आता शिवसेनेच्या महिला आघाडीने सुध्दा कंबर कसली असून नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या नेतृत्वाखाली शहर संघटक संगीता जांभळे, उप शहर संघटक समिना महापुळे, संपर्क संघटक प्रीती कळंबे, शलाका शेलार, श्रुतिका दाभेकर, अनिता मोरे, ऐश्वर्या शिंदे, हेमलता कदम, संजना शेलार, रचना सावंत, योगिता चौगुले, अंकिता मोरे, रिझवाना शेख, जुलेखा पटेल, दीपा परब, सुजाता शिंदे, निशा पार्टे, सविता शिंदे, कल्याणी शिंदे, जयश्री कदम, सविता कारंडे, सुहासिनी शिंदे आदी महिला मोठया प्रमाणावर सज्ज झाल्या आहेत. ह्या गावाला विकसनशील पर्यटनक्षेत्र बनविण्यासाठी प्रत्येक प्रभागात जाऊन जनजागृती आणि संघटना मजबूत करण्यास पुढाकार घेतला आहे. त्यामुळे आगामी काळात नक्कीच शिवसेनेचे पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित होणार असा विश्वास शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी व्यक्त केला आहे.

# शिहु येथे कोविड लसीकरण केंद्र सुरु

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण तालुक्यातील शिहू येथे ४५ वर्षांवरील नागरिकांसाठी कोविड लसीकरण सुरु करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी ८२ नागरिकांना कोविड लस देण्यात आली. शिहू विभागातील नागरिकांना गडब ग्रामीण आरोग्य केंद्र येथे लसीचे आयोजन केले होते, जे की खूपच गैरसोयीचे, त्रासदायक व खर्चीक होते.

ग्रुपग्रामपंचायत शिहूच्या सरपंच पल्लवी प्रसाद भोईर, पेण पंचायत समिती सभापती मनिषा संजय भोईर यांनी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय– अलिबाग, प्रांत कार्यालय पेण, जिल्हा आरोग्य अधिकारीअलिबाग यांना वारंवार लेखी पत्राद्वारे व फोन द्वारे संपर्क करून शिहू येथे लसीकरण केंद्र सुरु करण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यानुसार आज ४५ वर्षांवरील पहिल्या ८२ नागरिकांनी शांततेत कोरोना विषयक सर्व नियम पाळत पहिला कोविड लसीचा डोस घेतला. शासनाकडून जसे लसीचे डोस उपलब्ध होतील त्याप्रकारे ते नागरिकांना वेळोवेळी पूर्वकल्पना देऊन कळविले जाईल, असेही ग्रामपंचायत कार्यालयाकडून सांगण्यात आले.

सदर प्रसंगी पेण तालुका पंचायत समिती सभापती मनिषा संजय भोईर, माजी सभापती व विद्यमान सदस्य संजय भोईर, उपसरपंच सुजित गदमळे, डॉक्टर विशाखा पाटील, फुटाणे, आरोग्य सेविका व आशा वर्कर्स हजर होत्या.

# परेश ठाकूर यांच्या हस्ते मातोश्री धमके हॉस्पिटलचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये सोयीसुविधांनी सज्ज असे संजय क्लिनीक मातोश्री धमके मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते व महापौर कविता चौतमोल यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.२० जून) करण्यात आले. अत्याधुनिक, परवडणारे आणि नैतिक या त्रिसूत्रीच्या माध्यमातून पनवेलमध्ये संजय क्लिनिक मातोश्री धमके हॉस्पिटल रुग्णांना उपचार देण्यासाठी सज्ज झाले आहे. गेल्या ४५ वर्षांहून अधिक काळ पनवेलमध्ये रुग्णांना सेवा देणारे घोडके हॉस्पिटल नव्या रुपात पदार्पण करीत आहे. अत्यंत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांसह मातोश्री धमके हॉस्पिटल आरोग्य सेवेसाठी तत्पर झाले आहे.

पनवेल शहरात सन १९७४ पासून घोडके रुग्णालय म्हणून ओळखल्या जाणारे हॉस्पिटल हे डॉ. जगदीशचंद्र घोडके यांनी संजय क्लिनिक या नावाने सुरू केले, नंतर डॉ. राहुल घोडके यांनी ऑर्थोपेडिक रुग्णालय म्हणून चालविले. आता हेच रुग्णालय संजय क्लिनिक मातोश्री धमके हॉस्पिटल म्हणून सुरू करण्यात आले आहे.

उद्घाटनप्रसंगी पनवेल महापालिकेचे माजी आरोग्य सभापती नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका विद्या गायकवाड, माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी सिनिअर सर्जन डॉ. जगदीशचंद्र घोडके, ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. राहुल घोडके, गायनॅकोलॉजी व लॅपरोस्कोपी सर्जन डॉ. गणेश वाकचौरे, डॉ.सुप्रिया वाकचौरे, पॅथोलॉजीस्ट डॉ. संतोष वाकचौरे, डॉ.अरुणा वाकचौरे, गायनॅकोलॉजीस्ट डॉ. राजश्री धमके, कार्डिओलॉजीस्ट डॉ. सागर तांडेल यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मातोश्री धमके हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णांना आवश्यक असणाऱ्या सर्वच अत्याधुनिक सुविधा एकाच छताखाली रुग्णांना मिळणार असल्याने नागरिकांमधून याबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

# करंजाडे येथून महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

लक्ष्मी करे कामी (३० रा.सेक्टर ४ करंजाडे) असे या महिलेचे नाव असून उंची ५ फूट ३ इंच, रंग सावळा, बांधा सडपातळ, चेहरा उभट, नाक बसके, केस काळे लांब, डोळे काळे असून अंगात लाल रंगाचा ब्लाऊज त्यावर हिरव्या रंगाची साडी, कानात काळ्या रंगाची कर्णफुले, गळ्यात लाल रंगाची माळ, नाकात नथ, पायात पैंजण, तसेच ब्राऊन रंगाची चप्पल घातलेली आहे. डाव्या हातात घड्याळ व उजव्या हातात बांगड्या आहेत. तिला, हिंदी, गुजराती, नेपाळी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२–२७४५२३३३ किंवा पोलीस नाईक अभय कुंभार यांच्याशी संपर्क साधावा.

# तळा ठाणे नालासोपारा गाडीला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । तळा**

माणगांव आगाराची माणगांव तळेगाव तळा मार्गे ठाणे नाल–ासोपारा बस सुरू करण्यात आली असून सदर गाडीला तळा तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे प्रवाशी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

तालुक्यातील बहुसंख्यचाकरमानी आपले कुटुंबासह नालासोपारा विरार वसई उपनगरात नोकरी निमित्ताने रहात आहेत शेती, घरदार गावाकडे असल्याने नेहमी गावाला येणे जाणे सतत असल्याने या बसचा लागलांच लाभ झाला आहे. सदर बस माणगांव येथून सकाळी ९वा.सुटुन खरवली उसर, तळेगाव, तळा, इंदापूर, पेण, पनवेल, ठाणे, नालासोपारा कडे जात असल्याने अनेक प्रवाशांना सदर बसचा लाभ झाला आहे. त्यामुळे महामंडळाच्या उत्पनात वाढ झाली आहे. सदर बस नालासोपारा येथून सकाळी ६वा. सुटून वरील मार्गाने माणगांव येथे १२ पोहोचते. सदर बस सुरू केल्याने माणगांव आगार व्यवस्थापकांना धन्यवाद व्यक्त करीत आहेत. सदर बस कायम स्वरूपी ठेवावी अशी प्रवाशांची मागणी आहे. तळा तालुका डोंगराळ दुर्गम भागात वसला असल्याने एस् टी.सर्व सामान्यांचे दळणवळणाचे एकमेव साधन आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रवासी एस् टी बस वर अवलंबून आहे. तसेच गेल्या वर्षभरात कोरोना महामारी रोगामुळे बंद करण्यात आलेल्या ग्रामीण भागा–तील बस नियमितपणे सुरु करावी अशी प्रवाशांची मागणी जोर धरू लागली आहे.




### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की,मौजे पोयंजे,ता. पनवेल येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे अशीलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उता–यावरील कब्जेदार सदरात नमूद असलेल्या जमीन मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पोयंजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. रामदास पांडुरंग मते | २७ | भोगवटादार वर्ग १ | ०–१९–० | ०–५० |

सदरहू मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचाहक्क–हितसंबंध, कुळवहीवाट, ताबेकैंजा,एम्.ओ.यु, बोजा, साठेकरार, वचन चिठठी, बयाना पावती,फरोक्त खत, खरेदी खत, मृत्यूपत्र, गहाण–दान,बक्षिस,लिज, लिन, पोटगी हक्क, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७(सात)दिवसांचे आत योग्या त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजून आमचे अशील सदरहू मिळकतीबाबत खरेदी – विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणा–या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.
दिनांक :– २२/०६/२०२१

**ऑफिस : गाळ नं. १, समर्थ शिवराम मार्केट, मेन बाजार पेठ, मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड ४१०२२२. मो.नं.९६६५१९७२३१, ८८८८१३३४०२**

**सही/–**
**ॲड. विकास अशोक बडे**
**बी.ए. एल.एल.बी.**
**वकील उच्च न्यायालय**



मे.मुजावर साो.

ॲड.सरिता रामधरणे–शहासने

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७५१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०८/२०२१

श्रीमती.रीता शर्मा उर्फ रीता सुबोध पांडे
उ.व.३८ वर्षे, धंदा : गृहिणी : गृहिणी/नोकरी
रा.रो हाऊस नं.४०, विघ्नहर्ता एनक्लेव्ह,
फेज–२, पनवेल माथेरान रोड पनवेल,
सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सदरहू अर्जदार यांचे पती कै.सुबोध प्रेमनारायण पांडे ता.२२/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सबब सदरहू मयत व्यक्तीच्या पश्चात अर्जदार त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांचे पती कै.सुबोध प्रेमनारायण पांडे हे ता.२२/०४/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदरहू मयत सुबोध प्रेमनारायण पांडे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**रो हाऊस नं.४०, विघ्नहर्ता एनक्लेव्ह फेज २,**
**सर्व्हे नं.४६, हिस्सा नं.५ (१), गाव : शिलोत्तर रायचूर**
**(सुकापूर), ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्र ९७.५८ चौ.मी.**

वरील मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.२२ माहे जून सन २०२१ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



गोडसे साो

ॲड.राजकुमार व्ही जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२०२१

कै.मंदा काशिनाथ पाटील मयतचे वारस
१) श्री.दिनेश काशिनाथ पाटील
वय : ३३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.कोळेश्वर मंदिर जवळ, कोळीवाडा,
ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.धर्मी रामा भगत, पुर्वाश्रमीचे नाव
कु.धर्मी काशिनाथ पाटील
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१०७८, जरीमरी मंदिराजवळ,
कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.मंदा काशिनाथ पाटील ह्यांचे निधन दि.२६/०५/२०१७ रोजी गांधी हॉस्पिटल पनवेल येथे झाले असून श्री.दिनेश काशिनाथ पाटील वगैरे ह्यांनी कै.मंदा काशिनाथ पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| करंजाडे | १०२ ब व १०२ ब/१ | १०७/३ |
| | | १०७/४ |
| | | १२०/२ |
| | | १२२/३ |
| | | ११०/ई |
| | | ११६/२ |
| | | १०८/६ |
| | | १०९/८ |
| | | ११०/अ/१ब |
| | | ११०/अ/३ |
| | | १११/अ/१ |
| | | १०२/अ/५ |
| | | १०४/अ/४ |
| | | १०४/अ/५ |
| | | १०४/ब/२ |
| | | ११६/१ |
| | | १०६/४ |
| | १०२ ब १/२ | १०६/४ |
| | १०२ ब/२ | ११०/अ/१ अ |
| | १२० ब व १०२ ब | ११५ ब/० |
| | १०२ क | १०२/ब/१ |
| | १०२ ड | १०४/अ/२ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.मंदा काशिनाथ पाटील यांना मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.दिनेश काशिनाथ पाटील हे कै.मंदा काशिनाथ पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.दिनेश काशिनाथ पाटील यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.मंदा काशिनाथ पाटील यांच्या पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२२/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल



भाकरे साहेब

ॲड.राजकुमार व्ही जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५८३/२०२१
नि.नं.८
ने.ता.२३/०८/२०२१

कै.पुष्पा शंकर गोवारी मयतचे वारस
१) कु.अक्षय शंकर गोवारी
वय : २६ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) कु.राहूल शंकर गोवारी
वय : २५ वर्षे, धंदा : व्यवसाय
वरील १ व २ रा.१२३३, कोळीवाडा, पनवेल उरण रोड,
मटण मार्केट जवळ, ता.पनवेल, जि.रायगड
३) कुमारी. नम्रता शंकर गोवारी
वय : २१ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.सी/१०१, हरे माधव रेसिडेन्सी,
प्लॉट नं.१०३५/ए–२, उरण नाका,
ओल्ड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.पुष्पा शंकर गोवारी ह्यांचे निधन दि.०६/०७/०१९ रोजी गांधी हॉस्पिटल पनवेल येथे झाले असून कु.अक्षय शंकर गोवारी वगैरे ह्यांनी कै.पुष्पा शंकर गोवारी यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| करंजाडे | १०२ ब व १०२ ब/१ | १०७/३ |
| | | १०७/४ |
| | | १२०/२ |
| | | १२२/३ |
| | | ११०/ई |
| | | ११६/२ |
| | | १०८/६ |
| | | १०९/८ |
| | | ११०/अ/१ब |
| | | ११०/अ/३ |
| | | १११/अ/१ |
| | | १०२/अ/५ |
| | | १०४/अ/४ |
| | | १०४/अ/५ |
| | | १०४/ब/२ |
| | | ११६/१ |
| | | १०६/४ |
| | १०२ ब १/२ | १०६/४ |
| | १०२ ब/२ | ११०/अ/१ अ |
| | १२० ब व १०२ ब | ११५ ब/० |
| | १०२ क | १०२/ब/१ |
| | १०२ ड | १०४/अ/२ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.पुष्पा शंकर गोवारी यांना मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड वितरित करण्यात येणार आहे. कु.अक्षय शंकर गोवारी वगैरे हे कै.पुष्पा शंकर गोवारी यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट कु.अक्षय शंकर गोवारी यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.पुष्पा शंकर गोवारी यांच्या पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२२/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील नागझरी गाव येथील घरासमोर उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

अरुण म्हात्रे (३३) यांनी त्यांची ३५ हजार रुपये किंमतीची होंडा शाईन मोटार सायकल क्र.एमएच-४६-एडब्ल्यू-३०४८ काळ्या रंगाची ही राहत्या घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकल चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने तुटलेली ड्रेनेजची झाकणे आली बदलण्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाणा नाका रोड ते आशियाना सोसायटी या काँक्रीट रस्त्यावरील रहदारी जास्त असल्याकारणाने काही ठिकाणी ड्रेनेज ची झाकणं तुटली होती.याविषयी माहिती प्रभागातील जागरूक नागरिकांनी कार्यक्षम नगरसेवक विक्रांत पाटील यांना दिली.

या रस्त्यावरील रहदारी लक्षात घेता आणि काही दुर्घटना होऊ नये यासाठी तत्परतेने महानगर पालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून स्वतः जातीने उभे राहून ड्रेनेज ची झाकणं बदलून घेतले.नगरसेवक विक्रांत पाटील प्रभागातील समस्या स्वतः जातीने लक्ष घालून सोडवतात याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## जे एस डब्ल्यू कंपनीत कॉपर केबलची चोरी

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील जे एस डब्ल्यू कंपणीच्या प्लांट मधील दिड लाखाच्या कॉपर केबलची चोरी अज्ञात आरोपींकडून करण्यात आली होती. याबाबत जे एस डब्ल्यू कंपनी प्रशासनाने दिलेल्या फिर्यादीनुसार वडखळ पोलीस ठाण्यात १४ जून रोजी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वडखळ पोलिसांनी लावलेल्या तपासात पाच आरोपींना अटक करून मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.वडखळ पोलीस ठाण्याचे निरीक्षक बाळा कुंभार त्यांच्या मार्गदर्शनानुसार तपास अंमलदार रुईकर, दिनेश भोईर, अमोल म्हात्रे, राहुल पाटील, भोर,या पथकाने चोरीचा तपास लावून पाच आरोपींना अटक केली आहे.या चोरी बाबत अधिक तपास सुरू आहे.

# फी माफ मागणीसाठी प्रायव्हेट हायस्कूलमध्ये पालकांचे आंदोलन





**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोना महामारीमुळे मागील सुमारे दीड वर्षापासून विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षण न मिळता ही फी चा तगादा लावणार्याह पेण प्रायव्हेट हायस्कूलच्या इंग्लिश मिडीयम शाळेच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी प्रायव्हेट हायस्कूलच्या कार्यालयाबाहेर फी माफ करण्यासाठी आंदोलन केले.

मागील वर्षाच्या मार्च महिन्यापासून कोरोना महामारीमुळे शाळा, कॉलेजेस बंद आहेत. ऑनलाइन शिक्षणाच्या नावाने सुद्धा बोंब आहे. येथील शिक्षक व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विद्यार्थ्यांना न शिकवता केवळ युट्युब वरील व्हिडीओ विद्यार्थ्यांना व्हाट्सअपच्या माध्यमातून पाठवतात. शैक्षणिक दृष्ट्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन शिक्षक करीत नाहीत. अशी परिस्थिती असताना देखील शाळेकडून विद्यार्थ्यांच्या पालकांना फी भरण्याकरिता जबरदस्ती केली जात असल्याने संतप्त पालकांनी पेण एज्युकेशन सोसायटीच्या संचालकांना जाब विचारला.

कोरोना महामारीमुळे अनेक नागरिकांचा व्यवसाय धंदा ठप्प झाला आहे. पालकवर्ग आधीच आर्थिक अडचणीत आहेत. तसेच शाळेकडूनही विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन मिळत नसल्याने शाळा प्रशासनाने इंग्रजी माध्यमाच्या सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क ५० टक्के कमी करावे अशी मागणी संदिप तोंडीलकर यांनी या वेळी केली. देवेंद्र पाटील, वैभव घोसाळकर, माधवी म्हात्रे, मनिषा पाटील, भक्ती शेट्टी, अर्चना ठाकूर यांच्यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे शैक्षणिक मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. परंतु या शैक्षणिक संस्थांकडून केवळ हजारो रुपये शैक्षणिक शुल्क भरण्याकरिता तगादा लावला जातो. परंतु विद्यार्थ्यांना मात्र योग्यरीत्या शिकवले जात नाही. इमारत निधी पालकांकडून वसूल केली जाते परंतु प्रत्यक्षात नवीन इमारत बांधण्यातच आली नाही असा आरोप माधवी म्हात्रे यांनी केला.

शैक्षणिक शुल्क घेण्याची परवानगी शासनाच्या परिपत्रकात नुसार देण्यात आली असल्याने संस्था केवळ शैक्षणिक शुल्काची मागणी करीत आहे. सह शिक्षण फी ची आकारणी करण्यात आलेली नाही. त्याच प्रमाणे १२ महिन्यांची फी न घेता केवळ १० महिन्यांची फी संस्थेकडून आकारण्यात आहे. २ महिन्यांची फी संस्थेने माफ केली आहे. त्यामुळे पालकांना केवळ ७० ते ७२% फी भरावी लागणार असल्याची माहिती स्कुल संचालक बाळासाहेब जोशी व संचालक प्रशांत ओक यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

### शिक्षण नाही तर फी सुद्धा नाही

यासंदर्भात शिक्षणअधिकारी व शाळा प्रशासन यांच्याकडे वारंवार तक्रार करून देखील शाळेने थकीत असलेल्या शेकडो पालकांकडे ३० जूनच्या आत पैसे भरण्याची शेवटची मुदत दिल्याने पालकांचा संताप अनावर झाला. यावेळी शिक्षण नाही तर फी सुद्धा नाही असा पवित्रा पालकांनी घेतला. जर पुढील पंधरा दिवसात पेण एज्युकेशन सोसायटीने इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची फी कमी केले नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संदिप तोंडीलकर यांनी दिला.

# कोरोनाबाधित मृत व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी सरसावले पोलीस व आरोग्य यंत्रणा



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

कोरोनाच्या पहिल्या दिवसापासून आपल्या जीवाची पर्वा न करता पोलीस प्रशासन चोखपणे आपले कर्तव्य बजावत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना व निर्बंधासह पोलीस प्रशासन दिवसरात्र झटत आहे. असाच एक अनुभव सोमवारी रात्री श्रीवर्धन तालुक्यातील वांजळे याठिकाणी घडला.

आपले कर्तव्य बजावताना कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वांजळे गावातील एका कोरोनाबाधित मृत व्यक्तीचा अंत्यविधी करण्यासाठी पोलिसांसह आरोग्य यंत्रणेने माणुसकीचे दिव्यदर्शन घडवले आहे. मौजे वांजळे हनुमानवाडी येथील ८७ वर्षीय बाबू सोनू काते यांना कोरोनाची बाधा झाल्याने ते श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत होते. मात्र दुर्दैवाने सोमवारी रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास काते यांचे कोरोनाने निधन झाले.

वांजळे गावात कोरोनाबधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याची पहिलीच घटना असल्याने तसेच वांजळे गाव अत्यंत दुर्गम परिसरात असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कोरोनाबाधित व्यक्तीचा अंत्यविधी करणे कुटुंबियांसाठी व गावकऱ्यांसाठी धोक्याचे होते. त्यामुळे वांजळे ग्रामस्थांनी सदरची बाब दिघी सागरी पोलिसांना तात्काळ संपर्क साधून त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्याअनुषंगाने दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस नाईक संदीप चव्हाण, पोलीस नाईक सावंत, होमगार्ड घाडगे तात्काळ घटनास्थळी हजर झाले.

समवेत बोर्ली पंचतन प्रथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सूरज तडवी व त्यांचे कर्मचारी तसेच पोलीस पाटील उद्देश वागजे, श्रीराम काळदेवकर, सर्फराज दर्जी, अमोल चांदोरकर व वांजळे ग्रामस्थांच्या सहकार्याने तात्काळ सदर मयताच्या शवाचे विधिपूर्वक अंत्यविधी करण्यात आले. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अंत्यविधीदरम्यान पीपीई किटचा वापर करण्यात आला होता.

पोलिसांच्या व आरोग्य यंत्रणेच्या या महान कार्याचे व वांजळे ग्रामस्थांच्या जागरूकतेचे सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे.

# सर्पमित्र प्रणय जाधव याने दिले पाच फुटी कोब्रा सापाला जीवदान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

सर्पमित्र प्रणय जाधव याने विषारी व बिनविषारी सापांना सुरक्षितरित्या पकडून त्यांना जीवदान देण्याचे जणू धडपडच चालविली असून त्याने पुन्हा एकदा तालुक्यातील मेढे येथे असलेल्या राहूल घोडिंदे यांचे ऋतूराज फार्महाऊसवर अत्यंत विषारी असलेल्या पाच फुटी कोब्रा सापास सुरक्षितरित्या पकडून दिल्याचे त्यांनी सांगितले आहे.



सर्पमित्र प्रणय जाधव हा वाघेश्वर नगर रोठ खु.येथील रहिवासी असून सर्पमित्र म्हणून त्याची विशेष ओळख आहे.गेली काही वर्षात तो सर्पमित्र म्हणून सर्व परिचित झाला असून आतापर्यंत त्याने शेकडो विषारी व बिनविषारी सापांना जीवदान दिले आहे.तर या एका महिन्याच्या कालावधीत तर त्याने जवळपास २० साप पकडून सुरक्षितरित्या सोडून दिले आहेत.

मेढे येथील ऋतूराज फार्महाऊस येथे विषारी कोब्रा साप असल्याची माहिती तेथील विद्या घोडिंदे यांच्याकडून प्राप्त होताच प्रणय याने तिथे अडचणीत लपून राहिलेल्या कोब्रा सापास मोठ्या कौशल्याने पकडून जीवदान दिले आहे. तर त्याच्या या धाडसाचे सर्वत्र कौतूक केले जात आहे.

## मुरुड पोस्ट ऑफिसमध्ये आधार कार्ड सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । मुरुड**

शासन निर्णयानुसार दि. १४ जून पासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेशही सुरु झाले. नवीन शाळेत प्रवेश घेण्यासाठी आधारकार्डची गरज असते तसेच असलेले आधारकार्ड अपडेट करावे लागतात. परंतु वाढत्या कोरोना संक्रमणामुळे मुरुड पोस्ट ऑफिसमध्ये गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून आधार कार्ड सेवा बंद करण्यात आली आहे.

नवीन आधारकार्ड काढताना किंवा अपडेट करताना फिंगर प्रिंट्स घ्यावे लागतात. वेब फोटो घ्यावे लागतात तसेच फॉर्म भरून घ्यावे लागतात त्यामुळे कर्मचारी व आधारकार्ड लाभार्थी दोघांचा जवळून संपर्क येतो. त्यामुळे दोघांनाही कोरोना संक्रमण होण्याचा धोका असल्याने आधारकार्ड सेवा पोस्टाच्या अलिबाग मुख्य कार्यालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत बंद केल्याचे मुरुड पोस्ट कार्यालयाकडून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांची तसेच नागरिकांची मात्र यामुळे गैरसोय झाली आहे.

# खारघरमधील हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या बोगस डॉक्टरला रंगेहाथ अटक

## पोलीस आणि पनवेल महापालिका वैद्यकिय अधिकाऱ्यांची संयुक्त कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मेडीकल कौन्सिलची कुठल्याही प्रकारची डिग्री नसताना खारघर सेक्टर-१५ मधील मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये डॉक्टर बनुन काम करणाऱ्या व तेथील रुग्णांवर उपचार करुन त्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टराला खारघर पोलिसांनी अटक केली आहे. रोहित गुफ्तेश्वर यादव (२७) असे या बोगस डॉक्टरचे नाव असून पनवेल महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी व त्यांच्या पथकाने खारघर पोलिसांच्या मदतीने मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये छापा मारुन त्याला रंगेहाथ अटक केली आहे.

विशेष म्हणजे शिवाजी नगर पोलिसांनी या बोगस डॉक्टरला दोन वर्षापुर्वी अटक केल्यानंतर तो जामिन मिळवुन बाहेर आला होता. त्यानंतर देखील त्याने पुन्हा डॉक्टर बनुन रुग्णांवर उपचार करण्यास सुरवात केल्याचे तपासात आढळुन आले आहे. खारघर सेक्टर-१५ मधील मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये बोगस डॉक्टर काम करत असल्याची तक्रार ऍड.चित्रा साळुंखे यांनी खारघर पोलिसांना दिली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर बोगस डॉक्टरवर कारवाई करण्यासाठी पनवेल महापालिकेतील वैद्यकिय अधिकारी डॉ.भक्तराज भोईटे व त्यांच्या पथकाने आपल्या पथकातील व्यक्तीला पोटात दुखत असल्याचे भासवुन त्याला मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये पाठविले. यावेळी सदर हॉस्पीटलमध्ये रात्रपाळीवर असलेल्या बोगस डॉक्टर रोहीत यादव याने त्याची तपासणी करुन त्याला इंजेक्शन व औषधाची गरज असल्याचे सांगून त्याला मेडीकल मधून औषधे आणण्यास चिट्ठी लिहून दिली. याबाबतची माहिती महापालिकेच्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या पथकासह सदर हॉस्पीटलमध्ये छापा मारला. त्यानंतर त्यांनी बोगस डॉक्टर रोहीत यादव याच्याकडे चौकशी केली असता, तो सदर हॉस्पीटलमध्ये रात्रपाळीत आरएमओ असल्याचे तसेच तो पेशंट तपासण्याचे व औषध देण्याचे व रुग्णांवर रात्रपाळीच्या वेळेस पुर्णत: नियंत्रण ठेवण्याचे काम करत असल्याचे सांगितले. त्यांनंतर त्याच्याकडे वैद्यकिय डीग्रीबाबत चौकशी केली असता, त्याने कुठल्याही प्रकारची डिग्री नसल्याचे सांगितले. त्यानंतर सदर पथकाने हॉस्पीटलकडून त्याची माहिती घेतली असता, रोहीत यादव याने त्यावेळी ५ रुग्णांची तपासणी केल्याचे तसेच तो मागील दोन महिन्यापासून या हॉस्पीटलमध्ये रुग्णांना तपासण्याचे व त्यांच्यावर उपचार करत असल्याचे आढळुन आले. यावरुन रोहीत यादव हा बोगस डॉक्टर असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खारघर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्यावर फसवणुकीसह महाराष्ट्र वैद्यकिय व्यवसाय अधिनियमानुसार गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली.

बोगस डॉक्टर रोहीत यादव हा मुंबईतील शिवाजी नगर भागात बोगस वैद्यकिय व्यवसाय करत असताना शिवाजी नगर पोलिसांनी त्याला २०१९ मध्ये अटक केली होती. सदर गुह्यात तो जामिन मिळवून बाहेर आला होता. त्यानंतर त्याने दोन महिन्यापुर्वी खारघर सेक्टर-१५ मधील मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये डॉक्टर म्हणून कामाला लागला होता. या दोन महिन्याच्या कालावधीत त्याने रात्रपाळीवर कामाला असताना, अनेक रुग्णांवर उपचार केल्याचे तपासात आढळून आले आहे.

# माणगांव पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रविंद्र कुवेसकर



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव येथे झालेल्या पत्रकारांच्या सभेत रायगड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार अरुण पवार यांच्या मार्गदर्शना खाली माणगांव तालुका पत्रकार सेवा संघाच्या अध्यक्ष पदी ज्येष्ठ पत्रकार आणि व्यंगचित्रकार रविंद्र कुवेसकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

या सभेत माणगांव व रायगड जिल्ह्यातील समस्या व अडचणी सोडविण्यासाठी या स्वतंत्र पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली. रविंद्र कुवेसकर हे तीस वर्षे पत्रकारिता करीत आहेत. त्यांनी आपल्या धारधार लेखणीतून अनेक सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केल्याने त्यांना सामाजिक पुरस्कार मिळाले आहेत. ते सतत सामाजिक प्रश्नांवर आपल्या लेखणीतून भाष्य करीत असतात.

कोविड जनजागृती, सामाजिक आरोग्य, विविध समस्या लोकांसमोर मांडल्या आहेत. त्यांच्या कडून नेहमीच दर्जेदार लिखाण होत असल्याने संस्थापक अरुण पवार व सहकारी पत्रकारांनी त्याना अध्यक्षस्थानी निवडले. त्यांचे सर्व स्तरांवर अभिनंदन केले जात आहे.

तसेच संस्थापक अरुण पोवार यांच्या मार्गदर्शना-नुसार कार्याध्यक्षपदी - उदय चव्हाण, उपाध्यक्ष - प्रमोद जाधव, सचिव- सुनिल राजभर, खजिनदार- परेश शिंदे, सह-खजिनदार-वैभव सत्वे, जेष्ठ सल्लागार- अनिल मोकाशी, प्रसिद्धी प्रमुख- राम भोस्तेकर व कार्यकारिणी सदस्यपदी पांडुरंग माने, प्रतिक मोरे, चिन्मय म्हापसेकर, निरंजन कळस व जेष्ठ पत्रकार प्रमोद मोहिरे, मुकेश कडू यांची निवड करण्यात आली आहे. युवा-जेष्ठ पत्रकारांच्या या समस्या तुमची आणि साथ आमची! अस घोष वाक्य घेऊन स्थापण झालेल्या मा.ता.पत्रकार सेवा संघाचे सर्व स्तरातुन विशेष अभिनंदन होत आहे.

# तळा तालुक्यात जागतिक योग दिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**



तळा तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशमुख हॉल बाजारपेठ येथे जागतिक योग दिवस चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भाजपा माजी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे, गिरणे ग्रामपंचायत सरपंच सौ.ज्योती पायगुडे, शहर अध्यक्ष सुधीर तळकर, डॉ. सतिश वडके, ॲड. रातवडकर, पत्रकार संजय रिकामे, रितेश मुंढे, गितेश मेकडे, श्री.भागवत, श्री.तळकर आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. वडके यांनी मानसोपचार आणि योग याचे महत्व समजावून देऊन आनंदी राहण्यासोबत तणावविरहित जीवनासाठी योग किती आवश्यक आहे, याबाबत सविस्तर माहिती दिली. मानसिक आजारापासून दूर राहण्यासाठी नियमित योग सर्वांनी करावा, असे त्यांनी आवर्जून सांगितले भारतीय प्राचीन संस्कृती, परंपरा यांमध्ये योग, योगासने, योगसाधना यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. अगदी प्राचीन काळापासून ऋषीमुनी, साधुसंत यांनी वेळोवेळी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिलेली आहे. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तर तंदरुस्त ठेवू शकतो; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग, असे म्हणता येईल. भारतातील ही योग संस्कृती जागतिक पातळीवर बहुतांश देशांनी स्वीकारली असून, योगासनांचे लाभ त्यांनीही मोठ्या प्रमाणावर अनुभवले आहेत. जगभरातील देशांनी केवळ योग स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला. आताच्या घडीला संपूर्ण जगावर करोनाचे सावट असताना योग दिनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शक्य असलेल्या प्रत्येकाने योगाचा अंतर्भाव आपल्या दैनंदिन जीवनात नक्कीच करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. योग प्रशिक्षक श्री. तळकर आणि श्री.भागवत यांनी उपस्थितांकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले तसेच उपस्थित सर्वांनी योग करण्याचा संकल्पही केला. शेवटी ॲड. रातवडकर यांनी सर्वांचे आभार मानले.